शोधनिबंध विषयक रूपरेषा:

# महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्य विषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास

---

सुभाष सावंत,

प्राध्यापक व विभागप्रमुख,
भोसला मिलिटरी कॉलेज नाशिक, सभासद क्रमांक 1703,
भ्रमणध्वनी: 7588649683, ई-मेल: subhash.sawant@bmc. bhonsala.in

1. महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक व आरोग्य विषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास आणि त्यांचा राज्याच्या विकासावर काय परिणाम झाला आहे याचे विवेचन या शीर्षकाखाली अपेक्षित आहे. शिक्षण आणि आरोग्य हे देशाच्या सर्वांगीण विकासाचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. शिक्षित आणि आरोग्यदायी निरोगी लोकसंख्या ही देशाच्या विकासासाठी अत्यावश्यक आहे. शिक्षण हे देशाच्या आर्थिक विकासाचा आधार आहे. शिक्षण हे नवनवीन संशोधनास आणि उत्पादकतेत सुधारणा करण्यास मदत करते. निरोगी लोकसंख्या ही श्रम बाजारातील सहभाग आणि उत्पादकता वाढते आणि आर्थिक विकासात सुधारणा करते. थोडक्यात शिक्षण आणि आरोग्यातील गुंतवणूक देशाला विकसित करण्यास मदत करते. नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञा क्लॉडिया गोल्डिन यांच्या मते शैक्षणिक गुंतवणूक ही लोकांची उत्पादकता आणि त्यांच्यातील कौशल्य वाढवते. ज्याचा सकारात्मक परिणाम आर्थिक विकासावर होतो. उत्तम शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा हे नेहमीच कुठल्याही देशाच्या किंवा राज्याच्या प्रगतीस प्रोत्साहित करतात. चांगल्या शैक्षणिक सुविधांमुळे कुटुंब, समाज आणि देश यांची वर्धित दिशेने प्रगती होत असते. शिक्षण आणि आरोग्य यांचा आर्थिक विकासाशी सकारात्मक संबंध आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या विकासातील शिक्षण आणि आरोग्य यांची भूमिका याचा अभ्यास करता येईल.

2. जागतिक बँक प्रतिवर्षी मानव भांडवल निर्देशांक (Human Capital Index- HCI) प्रसिद्ध करत असते. मानव भांडवल निर्देशांक हे आज जन्माला आलेल मुल अठरा वर्षाचे झाल्यावर किती मानवी भांडवल प्राप्त करू शकते याची मोजमाप करते. मानवी भांडवल निर्देशांक आज कामगारांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्य आणि शैक्षणिक सुविधा कशा पद्धतीने पुढच्या पिढीच्या उत्पादकतेमध्ये सुधारणा करतात याचे मोजमाप करते. या संदर्भात महाराष्ट्रातील मानव भांडवल निर्देशांक मधील आरोग्य आणि शिक्षणाचे योगदान याचा अभ्यास करता येईल.

3. शिक्षण आणि आरोग्य यावर प्रतिव्यक्ती किंवा प्रति कुटुंब किती खर्च होतो याचा तुलनात्मक अभ्यास करणारा शोधनिबंध सादर करता येईल. असा तुलनात्मक अभ्यास महाराष्ट्रातील विविध जिल्हे, विभाग आणि महाराष्ट्र -इतर राज्य असाही करता येईल. तसेच विविध उत्पन्न गट, सामाजिक गट आणि त्यांची  शैक्षणिक पार्श्वभूमी यांच्यात तुलना करूनही करता येईल. आशा तुलनात्मक अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा आधार घेता येईल.

4. महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्य सुविधा याच्यावर परिणाम करणारे घटक कोणते आहेत, या विषयावर पूर्वी केलेल्या संशोधन याचा टिकात्मक अभ्यास करणे शक्य आहे.

5. शिक्षण आणि आरोग्य संबंधात महाराष्ट्राचे धोरण, धोरणांची उत्क्रांती, धोरणात झालेली विविध बदल आणि त्या धोरणाचे टीकात्मक मूल्यमापन असा अभ्यास करता येईल. याशिवाय शिक्षण आणि आरोग्य याबाबतच्या घटनात्मक तरतुदी, विविध कायदे, कायद्यात झालेले बदल आणि भविष्यात चांगल्या सुविधांसाठी कायद्यात करावे लागणारे बदल, या कायद्याची पार्श्वभूमी, त्याची गरज, परिणाम आणि त्यातील त्रुटी याचे विश्लेषण व मूल्यमापन यावर निबंध लिहिता येईल.

6. महाराष्ट्रातच नाही तर देशभरातच शिक्षण आणि आरोग्य याबाबत मोठ्या प्रमाणात असमानता जाणवते. उदाहरणार्थ शहरी आणि ग्रामीण, खाजगी आणि सार्वजनिक, गरीब आणि श्रीमंत इ. त्यामुळे आशा असमानतेची कारणे, त्याचे परिणाम आणि त्यावरील उपाय योजना सुचवणारा शोधनिबंध सादर करता येतील.

7. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आणि आरोग्य या सुविधांमध्ये किती आणि कशा पद्धतीने गुंतवणूक अपेक्षित आहे, त्यातून किती रोजगार निर्माण होईल आणि भविष्यात त्याचा लोकांचे आरोग्य, ज्ञान, कौशल्य आणि विकास यावर काय परिणाम होईल याचे विवेचन करणारा अभ्यास सादर करता येईल.

8. महाराष्ट्र हे विकासात अग्रेसर राज्य असले तरी महाराष्ट्रात आज आरोग्याच्या विविध समस्या जाणवतात. उदाहरणार्थ कुपोषण, बाल मृत्यू, माता मृत्यू, साथीचे आजार, विविध मानसिक आजार इ. महाराष्ट्रातील आरोग्याच्या संदर्भात असणाऱ्या विविध किंवा विशिष्ट समस्या यांचा आढावा घेणारा अभ्यास ही सादर करता येईल.

9. महाराष्ट्राच्या विविध आरोग्य योजना, तसेच महाराष्ट्रातील केंद्र पुरस्कृत विविध आरोग्य योजनेचा आढावा घेणारा शोध निबंध मांडता येईल. उदाहरणार्थ महात्मा फुले जन आरोग्य योजना, राजीव गांधी

जीवनदायी आरोग्य योजना, आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, अंगणवाडी आणि पोषण योजना, जल जीवन मिशन, स्वास्थ्य पायाभूत सुविधा योजना, पोषण शक्ती निर्माण योजना, राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन इ. यासाठी एखादी योजना घेऊन त्या योजनेवर झालेला आजपर्यंतचा खर्च, त्याचे लाभार्थी, त्या योजनेतील समस्या, भविष्यात करावे लागणारे अपेक्षित बद्दल, योजनेच्या अमलबजावणीत खाजगी क्षेत्राची भूमिका, विविध योजनांमधील तुलना असा अभ्यास करता येईल.

10. महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षण मिशन, सर्व शिक्षा अभियान, मोफत आणि सक्तीचे शिक्षण विधेयक 2008, नवीन शैक्षणिक धोरण 2020, वंचित घटकांसाठी असणाऱ्या शैक्षणिक सुविधा, साखर शाळा, निवासी शाळा, निवासी हंगामी वस्तीग्रह, राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांतर्गत शाळा, भटक्या विमुक्त घटकांसाठीच्या शाळा, वस्तीग्रहांच्या सुविधा, अपंग, मूकबधिर आणि मतिमंद यांच्यासाठीच्या शैक्षणिक सुविधा, आदिवासी शाळा, जिल्हा परिषद शाळा, मनपा शाळा, खाजगी शाळा, केंद्रीय शाळा इत्यादीचा आढावा घेणारा शोध निबंध सादर करता येईल. यासारख्या योजनांवर झालेला खर्च, या योजनांचे लाभार्थी, योजनांचे गुणदोष आणि त्यांचे मूल्यमापन याचा आढावा घेऊन उपाययोजना सुचवता येतील.

11. डॉक्टर्स, परिचारिका (नर्स), पॅथॉलॉजी लॅब, रुग्णालय (हॉस्पिटल्स), रुग्णवाहिका इत्यादी आरोग्य सेवांची उपलब्धता, महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर या सेवांचा झालेला विस्तार आणि विकास कशा पद्धतीने झाला ते मांडता येईल. त्याच पद्धतीने शैक्षणिक क्षेत्रात झालेले विविध बदल, त्याचे टप्पे, विस्तार, मनुष्यबळाची उपलब्धता व त्यांची गुणवत्ता, इतर शैक्षणिक सुविधांची उपलब्धता, त्यांची वैशिष्ट्य आणि समस्या याचे मूल्यमापन करणारा अभ्यास सादर करता येईल.

12. शिक्षण आणि आरोग्य यासंबंधी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि महाराष्ट्र पातळीवरील विविध अहवाल अभ्यास प्रसिद्ध झालेले आहेत. त्या अहवालांचे मूल्यमापन व त्यांची परस्परांशी तुलना यासंबंधी अभ्यास होऊ शकतो. केंद्र आणि राज्य सरकारने शिक्षण आणि आरोग्य या संदर्भात नेमलेल्या विविध समित्यांचे मूल्यमापन याची चर्चा शोधनिबंधात होऊ शकते.

13. शिक्षणाच्या विविध विद्याशाखा, विद्यार्थ्यांचा विविध विद्याशाखा प्रवेशाबाबतचा कल, शिक्षणाचे बाजारीकरण, महागडे शिक्षण, शिकवणी वर्गाचे वाढत चाललेले प्रस्थान आणि त्यातील अर्थकारण याची चर्चाही शोधनिबंधात होऊ शकते.

14. महाराष्ट्र सरकारचा आरोग्य आणि शिक्षणावरील खर्च, शिक्षण आणि आरोग्य यामुळे लोकांच्या जीवनमानावर झालेला परिणाम, 1991 मध्ये भारताने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे शिक्षण

आणि आरोग्य या दोन्ही क्षेत्रावर झालेलं परिणाम, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील खाजगीकरण आणि त्यातून आलेल्या विविध समस्या याचा अभ्यास करता येईल.

15. तंत्रज्ञानात झालेल्या बदलाचा शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रावर परिणाम होत आहे. तंत्रज्ञानातील बदलाचा या सेवांच्या उपलब्धतेवर, गुणवत्तेवर झालेला परिणाम आणि त्यांचा लोकांच्या जीवनमानावर झालेला परिणाम याची चर्चा शोधनिबंधात मांडता येईल.

16. शोध निबंध सादर करताना  प्रसिद्ध झालेले अहवाल व सांख्यिकीय माहिती, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय अहवाल, उपलब्ध असणारे दर्जेदार संदर्भ ग्रंथ यासारख्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेता येईल. याशिवाय लाभार्थी व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून माहिती संकलित करता येईल. शोध निबंधाची मांडणी करताना आवश्यकते प्रमाणे तक्ते, आलेख, आकृत्या आणि इतर सांख्यिकीय साधनांचा वापर करावा.